Sahaj Adhyayan
8552892890 (message us "Hi" on WhatsApp)
Subscribe & Join our YouTube Channel : **Sahaj Adhyayan**

For more study material register here (FREE) www.sahajadhyayan.in/register

# SSC BOARD QUESTION PAPER
## March 2022 – Marathi

**Time : 3 hrs** **Total : 80 marks**

कृतिपत्रिकेसाठी सूचना: -
(१) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.
(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच, या कृती लिहून घेऊ नयेत.
(४) विभाग ५ – उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ – गद्य

**१. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) कोणत ते लिहा. (२)

(i) भरपूर दूध देणारी –

(ii) जवळपास साडेपाच फूट उंचीची –

माझी आजी जवळपास साडेपाच फूट उंचीची, रंगाने गोरी असूनही उन्हापावसाने रापलेल्या त्वचेची. नवऱ्यामागं सगळा संसार गळ्यात पडूनही तिसऱ्या – आमच्या – पिढीवर हुकूमत गाजवणाऱ्या आजीच्या हातात सत्तरी ओलांडली तरी काठी आली नव्हती. दात सगळे शाबूत तर होतेच; पण मोत्यासारखे चमकत राहायचे. डोकीत एकही केस काळा नव्हता. विशाल कान, धारदार नाक, चेहऱ्यावर सुरकुत्या पडूनही तरुणपणाच्या सौंदर्याची जाणीव करून देणारी चेहऱ्याची ठेवण, ताठ कणा, पायांत जुन्या वळणाच्या नालाच्या वहाणा. अंगात चोळी आणि हिरवं व लाल अशी दोन रंगांची नऊवारी इरकल लुगडी. कपाळावरचं गोंदणं दिसू नये म्हणून त्यावर लावलेला बुक्का. आजीच्या छत्रछायेखाली आमचे सर्व कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत होते.

आमच्या घरी एक गावरान गाय होती. तिला आम्ही कपिली म्हणायचो. कपिली दूधही भरपूर द्यायची. आमचे वडील किंवा काका धार काढायला निघाले, की ग्लासं घेऊन आमचा मोर्चा गोठ्यात. गाईनं पान्हा सोडला, की वासरू आखडायचं न् चरवीतल्या दुधाच्या धारांचं संगीत ऐकत चरवी भरण्याची वाट बघायची.



Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

(२) खालील वाक्ये चूक की बरोबर ते लिहा. (२).

(i) लेखकाची आजी धार काढायला निघायची. –

(ii) लेखकाच्या घरी एक गावरान गाय होती –

(३) स्वमत (३)

लेखकाच्या आजीचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) नावे लिहा. (२)

(i) गर्दीनं फुललेलं स्टेशन – - - - - - -

(ii) अरुणिमाचे गाव – - - - - - - -

दोस्तांनो, मी... अरुणिमा सिन्हा! आज तुम्ही गुगलवर शोधले तर ‘माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली अपंग महिला आणि माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली अपंग भारतीय’ असा उल्लेख जिचा दिसतो तीच मी! पण एक सांगू? णी काही जन्मजात अपंग वगैरे नाही... नव्हते... धडधाकट असल्यापासूनची गोष्ट आज मी सांगणारेय तुम्हांला...

लखनऊपासून २०० किमी. अंतरावर असणारं आंबेडकरनगर हे माझं गाव. घरी मी, आई, लहान भाऊ. णोठ्या बहिणीचं लग्न झालेलं. माझे वडील मी लहान असतानाच देवाघरी गेले. आता भाईसाब (मोठ्या बहिणीचे पती) हेच काय ते आमच्या कुटुंबातले महत्त्वाचे निर्णय घेणारे. खेळांवर अतोनात प्रेम करणाऱ्या कुटुंबात मी जन्मले हे माझे अहोभाग्य; पण फुटबॉल आणि व्हॉलीबॉलची नॅशनल चॅम्पियनशिप मिळाल्यावर ‘आता सीआयएसएफ (एघ्इ) ची नोकरी मिळते का बघ, म्हणजे खेळाशी जोडलेली राहशील’, हा भाईसाबनी दिलेला सल्ला मी शिरोधार्य मानला. त्यानुसार नोकरीसाठी अर्ज केला नि ‘कॉल लेटर’ आले देखील; पण फॉर्ममध्ये नेमकी माझी जन्मतारीखच चुकवलेली होती. हा घोळ निस्तरण्यासाठी दिल्लीला जाणे भाग होते.

११ एप्रिल, २०११ चा हा दिवस. लखनऊ स्टेशन गर्दीनं फुललेलं. पद्मावती एक्सप्रेसमध्ये कसेबसे चढत गर्दीतून मुसंडी मारत शिताफीने मी कॉर्नर सीट पटकावली.

**(२) कारणे लिहा. (२)**

(i) अरुणिमाला दिल्लीला जाणे भाग होते, कारण - - - - - -

(ii) अरुणिमाने ‘सीआयएसएफ’ मध्ये नोकरीसाठी अर्ज केला, कारण - - - - - -



Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan


**(३) स्वमत (३).**

‘प्रत्येकामध्ये एक जिद्दी अरुणिमा असते’, याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

## अपठित गद्य

(इ) (१) आकृती पूर्ण करा. (२)

सौजन्यशील व्यक्तीच्या मनात असलेल्या भावना



सौजन्य हे सुजनांकडून अपेक्षावयाचे असते. ज्यांच्या मनात प्रेम, सहभावना, आपुलकी, स्नेहशीलता आहे, अशांच्याजवळ सौजन्य असते. सौजन्याला नम्रतेची जोड मिळाली तर सोन्याहून पिवळे होते. जगात वावरताना सौजन्यशील वृत्ती अंगी बाणलेली असली तर अनेक फायदे होऊ शकतात; पण त्याहीपेक्षा आपण माणूस आहोत, पशू नाही याची जी जाणीव होते तीच महत्त्वाची असते. ज्याची वृत्तीच आक्रमक असते आणि ज्यांचा स्वभाव जुळवून घेण्याचा नसतो, त्यांची वृत्ती ही स्वभावत: पशूची असते. त्यामुळे त्यांच्याजवळ सौजन्य असेल कसे? सौजन्य ही मानसिक वृत्ती आहे. मनातून ती साकारते व कृतीतून प्रकट होते. व्यवहारात अशा वृत्तीतून जे वागणे होते किंवा आचार घडतो अशाच आचाराला सौजन्य म्हटले जाते. सौजन्यातून प्रेम व्यक्त होते.

(२) चौकटी पूर्ण करा. (२)

(i) सुजनांकडून अपेक्षित असलेले – ☐

(ii) सौजन्यातून व्यक्त होणारे – ☐

## विभाग २ – पद्य

२. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

(१) चौकटी पूर्ण करा. (२).

(i) कष्टाने मिळणारे – ☐

(ii) घामातून फुलणारे – ☐

Sahaj Adhyayan



Message us for last 5 years board question papers

Contact us: @SahajAdhyayan
Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

आकाशी झेप घे रे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा
तुजभवती वैभव, माया
फळ रसाळ मिळते खाया
सुखलोलुप झाली काया
हा कुठवर वेड्या घेसी आसरा
तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरि-डोंगर, हिरवी राने
जा ओलांडुनी या सरिता-सागरा
कष्टाविण फळ ना मिळते
तुज कळते परि ना वळते
हृदयात व्यथा ही जळते
का जीव बिचारा होई बावरा
घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले
हा योग जीवनी आला साजिरा

(२) योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा. (२)

(i) सुखलोलुप झाली काया म्हणजे - - - - -
(अ) सुखाचा तिरस्कार वाटतो.
(आ) सुखाबद्दल प्रेम वाटते.
(इ) सुखाचे आकर्षण वाटते.
(ई) सुख उपभोगण्याची सवय लागते.

(ii) पिंजरा सोडून झेप घेतल्याने - - - - -
(अ) काया सुखलोलुप होते.
(आ) पाखराला आनंद होतो.
(इ) आपल्याला स्वसामर्थ्याची जाणीव होते.
(ई) आकाशाची प्राप्ती होते.



Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

(३) खालील काव्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा. (२)

तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरि-डोंगर, हिरवी राने
जा ओलांडुनी या सरिता-सागरा

(४) काव्यसौंदर्य (२)

'आकाशी झेप घे रे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा'
या ओळींमधील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

| मुद्दे | 'आश्वासक चित्र' किंवा 'वस्तू' | | |
|---|---|---|---|
| ग) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री | | | (१) |
| गग) कवितेचा विषय | | | (१) |
| गगग) शब्दांचे अर्थ लिहा. | ग) झरोका<br>गग) कसब | ग) स्नेह<br>गग) निखालस- | (२) |

**(इ) खाली दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा. (४).**

खोद आणखी थोडेसे
खाली असतेच पाणी
धीर सोडू नको, सारी
खोटी नसतात नाणी.

## विभाग ३ – स्थूलवाचन

३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. (६)

(१) भरकटलेल्या मुलांसाठी रेखा मिश्रा यांनी केलेले कार्य तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(२) गिरिजा कीर यांच्या 'यडबंबू ढब्बू' या बालकादंबरीतील विनोद तुमच्या शब्दांत लिहा.

(३) व्युत्पत्तीकोशाचे कार्य स्पष्ट करा.



Message us for last 5 years board question papers

Contact us: @SahajAdhyayan    Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

## विभाग ४ – भाषाभ्यास

४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.

(१) समास

योग्य जोड्या जुळवा. (२)

| क्र. | सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|---|
| (i) | विटीदांडू | द्विगू |
| (ii) | नीलकमल | समाहार द्वंद्व |
| (iii) | पंचपाळे | इतरेतर द्वंद्व |
| (iv) | भाजीपाला | कर्मधारय |

**(२) शब्दसिद्धी**

**खालील तक्ता पूर्ण करा. (२)**

अभिनंदन, हळूहळू, सामाजिक, उपमुख्याध्यापक.

| प्रत्ययघटित शब्द | उपसर्गघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| | | |

(३) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (४)

(i) कानोसा घेणे

(ii) आनंद गगनात न मावणे

(iii) कंठस्नान घालणे

(iv) पित्त खवळणे

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती

(१) शब्दसंपत्ती

(१) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. (१)

(i) दुसऱ्यावर अवलंबून असलेला -- - - -

(ii) दररोज प्रसिद्ध होणारे -- - - -



Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

(२) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा. (१)

(i) पृथ्वी — - - - - -

(ii) नभ — - - - - -

(३) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (१)

(i) सुरुवात - - - -

(ii) सोय - - - -

(४) खालील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. (१)

राखणदार (राखण व दार हे शब्द वगळून)

(२) लेखननियमांनुसार लेखन (२)

अचूक शब्द ओळखा (कोणतेही चार शब्द सोडवणे)

(i) दूर्मीळ/दुर्मिळ/दूर्मिळ/दुर्मीळ

(ii) पीढी/पिढी/पिढि/पीढि

(iii) कुटुंब/कुटूंब/कूटूंब/कूटुंब

(iv) आशिर्वाद/आर्शीवाद/आशीर्वाद/आर्शिवाद

(v) उज्ज्वल/उज्वल/ऊज्ज्वल/ऊज्वल

(vi) सामुहिक/सामूहिक/सामूहीक/सामुहीक

(३) विरामचिन्हे (१)

खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.

(i) , –

(ii) “ ” –

(४) पारिभाषिक शब्द (१)

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.

(i) Unit –

(ii) Action –



Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**५. (अ) खालील कृती सोडवा. (६).**

(१) पत्रलेखन

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

**साहित्य सेवा वाचनालय, साखरवाडी**

**आयोजित**

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

व

पारितोषिक वितरण सोहळा

स्पर्धा -
दि. २० मार्च

वेळ -
स. ९ वाजता

प्रमुख पाहुणे – श्री. विक्रम मेहेंदळे

अध्यक्षा – श्रीमती रेखा महाजन

स्थळ – हुतात्मा सभागृह, साखरवाडी

संपर्क – आयोजक, साहित्य सेवा वाचनालय, साखरवाडी

E-mail – sahityaseva@gmail.com

विनय/विनया देशमुख
विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

विद्यालयातील पाच विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेत सहभागी करून घेण्यासाठी आयोजकांना विनंती करणारे पत्र लिहा.

**किंवा**

वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल मित्राला / मैत्रिणीला अभिनंदन करणारे पत्र लिहा.



Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

**किंवा**

(२) सारांशलेखन

विभाग - १ : गद्य (प्रश्न क्र. १ (इ)) मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. (१०)

(१) जाहिरातलेखन

योगासन वर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

(२) बातमीलेखन

कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त, दि. २७ फेब्रुवारी रोजी 'साधना विद्यालय, रायरी' या विद्यालयात 'मराठी भाषा दिन' साजरा झाला. या समारंभाची बातमी तयार करा.

(३) कथालेखन

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.

शाळेत जाणारा कष्टाळू, प्रामाणिक मुलगा – वाईट मित्रांची संगत – शिक्षकांना काळजी – मुलाला घेऊन बाजारात फेरफटका – उत्तम प्रतीच्या आंब्यांची खरेदी – एक डागाळलेला – दोन दिवसांनी पाहणी – नासक्या आंब्यामुळे बाकीचे आंबे खराब – तात्पर्य.

(इ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (८).

(१) प्रसंगलेखन

| |
|---|
| सुहृद मंडळ, नाशिक |
| – आयोजित – |
| बालकुमार चित्रकला स्पर्धा – पारितोषिक वितरण समारंभ |
| दि. – १० डिसेंबर       वेळ – सकाळी १०.०० |
| प्रमुख पाहुणे – मा. रजनी गुप्ते |
| सुहृद मंडळ, नाशिक |

वरील समारंभ प्रसंगी तुम्ही तुमच्या मित्राचे/मैत्रिणीचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.




Message us for last 5 years board question papers

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

(२) आत्मकथन

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.




(३) वैचारिक

‘पर्यावरण जतन – काळाची गरज’, या विषयावर तुमचे विचार लिहा.

**Subscribe to our youtube channel for more study material.**

# Sahaj Adhyayan

YouTube (मराठी माध्यम): www.youtube.com/sahajadhyayan

YouTube (Semi/English Medium):
https://www.youtube.com/SahajAdhyayanSemiEnglish

Instagram: www.instagram.com/sahajadhyayan

Facebook: www.facebook.com/sahajadhyayan

WhatsApp: **8552892890** (save as **Sahaj Adhyayan)** (message only)

Website: **www.sahajadhyayan.in**

Install our educational android app from play store:
https://play.google.com/store/apps/details?id=com.app.sahaj_adhyayan



Message us for last 5 years board question papers

Contact us: @SahajAdhyayan Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

Class 5 - https://sahajadhyayan.in/class5/

Class 6 - https://sahajadhyayan.in/class6/

Class 7 - https://sahajadhyayan.in/class7/

Class 8 - https://sahajadhyayan.in/class8/

Class 9 - https://sahajadhyayan.in/class9/

Class 10 - https://sahajadhyayan.in/class10/

Class 11 - https://sahajadhyayan.in/class11/

Class 12, MHT-CET; JEE, NEET - https://sahajadhyayan.in/class12/

Sahaj Adhyayan Sahaj Adhyayan Sahaj Adhyayan



Message us for last 5 years board question papers